# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३२८-२२** **दिनांक ०६/११/२०२२**

## बँक खाते अपडेट करण्याच्या नावाने फसवणुक करण्यात आलेली ३१,९९०/- रुपये रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील मिरारोड परिसरात राहणाऱ्या महिला श्रीमती नेबुला यांना त्यांचे मोबाईलवर **OTP** प्राप्त झाला. त्यानंतर काही वेळाने त्यांना बँक खाते अपडेटचे काम सुरु आहे असे सांगून **OTP** प्राप्त करुन घेतला व त्यांचे बँक खात्यातुन ४२,१८८/- रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकामी प्राप्त झाला होता.

सदर अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने सायकबर गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी तक्रारदार यांचे बँक खात्यामधील झाले व्यवहाराची माहिती घेतली व मिळालेल्या माहितीचे आधारे सदरची रककम **True Balance** हया पेमेंट गेटवेकडे वळते झालेले असल्याच निदर्शनास आले. त्यांनंतर संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीवरुन संबधित रक्कम फ्लिपकार्टवर गेल्याचे दिसून आल्याने संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली ३१,९९०/- रुपयाची रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेले आहे व उर्वरीत रक्केमबाबत चौकशी सुरु आहे.

**घ्यावयाची काळजी :-**

- बँक/क्रेडीट कार्ड कंपनी ग्राहकांना बँक खाते अपडेट करण्यासंदर्भात मोबाईलवर संपर्क करत नाही.
- आपल्या बँकेची गोपनीय माहिती कोणाकडेही उघड करु नये.
- आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये.
- अनोळखी लिंक किंवा क्युआर कोड स्कॅन करु नये.

तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना अशा प्रकारे होणाऱ्या फसवणूकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा. माधूरी धिंडे, पो.अं. प्रविण आव्हाड, म.सु.ब. आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**